# रेकॉर्डवरून गुन्हेगारांची माहिती मिळविणे, गुन्हेगारांची MOB

गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय नाशिक

# अटक व रिमांड

## गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय नाशिक

# अटक म्हणजे काय व अटकेचा उद्देश

- अटक हा पोलीस तपासातील सर्वात महत्वाचा भाग असुन चुकीची पध्दत अवलंबल्यामुळे पोलीसांना कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागते. त्यामुळे पोलीस दलाबद्दल जनमानसात वाईट प्रतिमा तयार होते. त्या करीता अटकेबाबतच्या कायदेशीर तरतुदी व पध्दत जाणुन घेणे हि प्रत्येक पोलीस अधिकारी / अंमलदार जबाबदारी आहे.
- एखाद्या नागरिकाने काही गुन्हा केला आहे म्हणुन त्याच्याविरूध्द तथाकथित तक्रार केली जाते. त्याचा परीणाम म्हणुन त्याच्यावर शारीरिक बंधन आणले जाते म्हणजे अटक होय,
- अटक झाली आहे असे म्हणण्याकरता त्या व्यक्तीस पकडले जाते अगर व्यवहारीक भाषेत अटक म्हणजे व्यक्तीस्वातंत्राचे हरण करणे होय,
- अटक करण्यामागे दोन उद्देश असतात १) कोर्टापुढे अशा इसमास हजर करणे, २) त्याला त्याचे बेकायदेशीर कृत्य करण्यापासुन परावृत्त करणे

# अटक कोण करू शकतो व त्याबाबतच्या कायदेशी तरतुदी

१) पोलीस अधिकारी / अंमलदार

२) खासगी  नागरीक

३) न्यायाधिशांना

- पेलीसांचे अकचे अधिकारी :- फौजदारी दंडा प्रक्रिया संहिता कलम ४१, ४२, १५१ व ४३२(३) तसेच म.पो.अधि. कलम ६९, ७९, ८१ व १२० प्रमाणे पोलसांना विनावॉरंट अटक करण्याचे अधिकार आहेत.

# फौ.दं.प्र.सं. कलम ४१ प्रमाणे अटकेचे अधिकार

३) त्या व्यक्तीला फौ.द.प्र.सं. अगर राज्य शासनाच्या आदेशाव्दारे अपराधी म्हणुन जाहीर केलेले आहे.

४) चोरीचा माल त्या व्यक्तीपाशी मिळाला आहे. आणि तसा वाजवी संशय घेता येईल.

५) पोलीसांच्या कर्तव्यात अडथळा आणणारी व्यक्ती अगर हि व्यक्ती कायदेशीर रखवालीतुन निसटली आहे. अगर तसा प्रयत्न केला आहे.

६) केंद्र सरकारच्या सशस्त्र सेनादलापैकी कोणत्याही सेनादलातुन पळुन आल्याचा वाजवी संशय अगर खात्री असल्यास

७) भारतात जे कृत्य केले असता गुन्हा झाला असता असा गुन्हा जर भारताबाहेर केला आहे. अगर तशी फिर्याद दिली आहे. अगर विश्वसनीय खबर दिली आहे किंवा तसा वाजवी संशय आहे तेव्हा

# फौ.दं.प्र.सं. कलम ४१ प्रमाणे अटकेचे अधिकार

८) जी व्यक्ती दोषी ठरून क्रिमीनल प्रोसिजर कोड कलम ३५६(५) प्रमाणे तरतुद केली आहे, पण त्या व्यक्तीने त्यातील नियमांचा भंग केला आहे तर त्या व्यक्तीस

९) दुस-या पोलीस स्टेशनमधुन अटकेकरता लेखी अगर तोंडी मागणी असेल आणि त्या मागणीपत्रात अपराध आणि अन्य कारण दर्शविलेले असेल तर त्या पोलीस स्टेशन मधील अधिका-यास वरील सर्व कारणांकरीता वॉरंटाशिवाय अटक करता येते.

- कलम ४१(२) प्रमाणे चॅप्टर केसेस कलम १०९-११० मधील कोणत्याही व्यक्तीस पोलीस ठाणे अंमलदार अटक करू शकेल किंवा अटक करवु शकेल.

# फौ.दं.प्र.सं. कलम ४१ प्रमाणे अटकेचे अधिकार

८) जी व्यक्ती दोषी ठरून क्रिमीनल प्रोसिजर कोड कलम ३५६(५) प्रमाणे तरतुद केली आहे, पण त्या व्यक्तीने त्यातील नियमांचा भंग केला आहे तर त्या व्यक्तीस

९) दुस-या पोलीस स्टेशनमधुन अटकेकरता लेखी अगर तोंडी मागणी असेल आणि त्या मागणीपत्रात अपराध आणि अन्य कारण दर्शविलेले असेल तर त्या पोलीस स्टेशन मधील अधिका-यास वरील सर्व कारणांकरीता वॉरंटाशिवाय अटक करता येते.

- कलम ४१(२) प्रमाणे चॅप्टर केसेस कलम १०९-११० मधील कोणत्याही व्यक्तीस पोलीस ठाणे अंमलदार अटक करू शकेल किंवा अटक करवु शकेल.

# फौ.दं.प्र.सं. कलम ४२ प्रमाणे अटकेचे अधिकार

**पोटकलम १)** पोलीस अधि-यासमक्ष एखाद्या नागरिकाने बिनदखली अपराध केला आहे अगर तसा आरोप असेल तर त्या पोलीस अधिका-याने नाव-गांव विचारल्यावर जर नकार दिला अगर खोटे सांगितले, तर त्याची खात्री करता यावी म्हणुन अटक करू शकेल.

**पोटकलम २)** जर खरे नांव सांगीतले तर त्याचा जामीन जामीनदारासह अगर न घेता त्याने न्यायधिशांपुढे हजर व्हावे म्हणुन लिहुन घेतला जाईल.

**पोटकलम ३)** अटक केल्यापासुन २४ तासांच्या आत जर खरे नाव-गांव कळले नाही, अगर त्या व्यक्तीने जामीन देण्याचे टाळले, तर त्या व्यक्तीस त्वरीर नजीकच्या अधिकार असलेल्या न्यायाधिशांपुढे हजर करावे.

# अटक करण्याची पध्दत

- फौ.दं.प्र.सं. कलम ४६ अन्वये नागरीकांना अटक कशी करावी याची विशिष्ट पध्दत या कलमातील पोट कलम १ ते ३ नमुद केली आहे

**पोट कलम १) :-** जर अटक होणा-या व्यक्तीने शब्दाने अगर कृतीने स्वाधीन होण्याची तयारी दर्शविली तर अटकेला पुरेशी आहे. पण तशी तयारी दर्शविली नाही तरच त्या व्यक्तीच्या शरीरास प्रत्यक्षपणे स्पर्श करावा. अगर त्याला वेढा घालावा. शब्द - कृती पुरेशी असते असे सुप्रीम कोर्टाने A.I.R – 1980 S.C. 1632/1980 Cr. L.J. 125 मध्ये म्हटले आहे.

**पोट कलम २) :-** पण जर अशा व्यक्तीने पोलीसांना प्रतिकार केला किंवा अटक चुकविण्याचा प्रयत्न केला तर पोलीस अधिकारी अगर अन्य व्यक्ती अटक करण्यासाठी जरूर त्या सर्व मार्गाचा अवलंब करता येईल.

# अटक करण्याची पध्दत

**पोट कलम ३) :-** मात्र अटक करतांना त्या व्यक्तीचा मृत्यु घडवुन आणण्याचा हक्क मिळत नाही. पण याला एक **अपवाद** आहे. जर ज्या गुन्हयाबाबत अटक करणे आहे तो गुन्हा जर गंभीर भारी स्वरूपाचा असेल म्हणजेच त्याला मृत्यूची (फाशी) अगर अजीवन कारावासाची शिक्षा आहे. जसे खुन - दरोडा - बलात्कार वगैरे गुन्हे यात मोडतात.

वरील कायदेशिर कलम पहाता हे स्पष्ट होते की, कायद्यात अटकेची व्याख्या दिली नसली तरी पध्दत दिली आहे. ती पध्दत वापरूनच नागरिकास अटक करावी. प्रत्यक्षात स्पर्श अगर बेडया काढण्या घालणे बिलकुल समर्थनीय नाही. केवळ तुम्हास अटक केली आहे - YOU ARE UNDER ARREST म्हणुन तो स्वाधीन झाला की पुरेसे आहे.

# निवेदन /मेमोरंडम
# पंचनामा

## गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण
## विद्यालय नाशिक

भा.पु.का कलम 27 अन्वये निवेदन पंचनामा :-

- भारतीय पुरावा कायदा कलम 27 प्रमाणे निवेदन पंचनाम्याची तरतूद आहे. न्यायालयात खटला सुरु असतांना आरोपीच्याविरुध्द पुरावा ग्राहय धरण्यासाठी कलम 27 प्रमाणे कोणता पुरावा ग्राहय धरण्यात यावा याबद्दल विश्लेषन केले आहे.

- पोलीसांच्या ताब्यात असणा-या आरोपीने एखादया गोष्टीचे/वस्तूचे पंचासमक्ष निवेदन दिल्यानंतर त्या गोष्टी मिळून आल्यास तर हा पुरावा न्यायालयात आरोपीच्या विरुध्द ग्राहय धरला जातो.

- तसेच आरोपी ज्या गुन्हयात अटक आहे. त्या गुन्हयाव्यतिरिक्त दुस-या गुन्हयांच्या गोष्टीतील कबूली त्यानी दिली व त्या कबूलीजबाबाप्रमाणे त्या गोष्टी किंवा वस्तू त्या ठिकाणी मिळून आल्या तर सदरचा पुरावादेखील आरोपीविरुध्द ग्राहय धरला जातो.
- मिळून आलेली गोष्ट किंवा वस्तू ही पूर्वी घडलेल्या गुन्हयांशी संबधित असावी अथवा चोरीस गेलेली असावी तरच त्या वस्तूचा गुन्हयातील आरोपीविरुध्द पुरावा म्हणून वापर करता येईल.
- एखादा आरोपी पोलीस कोठडीत असताना त्याच्याकडून मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने एखादे तथ्य किंवा नवीन बाब उघडकीस आली आहे अशी जबानी देण्यात आलेली असेल तेव्हा अशा माहितीपैकी जेवढा भाग त्यामुळे उघडकीस आलेल्या तथ्याशी निसंदिग्धपणे संबंधित असेल तेवढा शाबीत करता येईल.

➢ आरोपीने दिलेल्या कबूलीजबाबाप्रमाणे ज्या गोंष्टीचा किंवा वस्तूचा शोध घेतला जातो तेवढाच कबूलीजबाब आरोपीच्या विरुध्द पुरावा म्हणून ग्राहय धरला जातो.

**उदा**. अ) आरोपी पोलीस कोठडीत असताना त्यांनी सांगितले की, मी ज्याठिकाणी हिरे ठेवले आहे त्या ठिकाणावरुन हिरे काढून देतो. सदर ठिकाणी हिरे सापडले तर आरोपीने जी माहिती दिली ती पूर्णत: लागू होईल. परंतु हिरे सापडले नाही तरीही ती जागा उघडकीस आली असेल तर सदर बाब लागू असल्याने कलम 27 प्रमाणे त्यात तथ्य आहे.

**निवेदन पंचनामा करताना तपासी अधिका-यांनी लक्षात ठेवण्या योग्य महत्वाचे मुद्दे** :-

- गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले व व्यावसायिक पंच वापरु नये.
- पंचनाम्यात जप्त करण्यात आलेल्या वस्तूंचे वर्णन न लिहिता मोकळी जागा सोडू नये.
- जप्त करण्यात आलेल्या वस्तूवर लावण्यात आलेल्या लेबलवर आतमधील वस्तूंचे वर्णन लिहावे.
- पंचनाम्याची प्रत मिळाल्याबाबत आरोपी किंवा ज्या इसमांकडून वस्तू जप्त करण्यात आल्या आहेत त्याची जप्ती पंचनाम्यावर सही घ्यावी.
- वस्तू ताब्यात घेताना एकापेक्षा अधिक वस्तू एकत्र बांधून ताब्यात घेवू नये.

- जप्त करण्यात आलेल्या वस्तू कोणत्या ठिकाणावरुन ताब्यात घेतल्या हे सुसंगतपणे लिहावे.
- पंचनाम्यादरम्यान घेतलेल्या वस्तूना त्या जागेवरची माती लागली असल्यास त्या जागेवरील मातीचा नमूना परीक्षणासाठी घ्यावा.
- पंचाना मराठी येत नसून देखील पंचनाम्याच्याशेवटी पंचनामा मराठीतून वाचून दाखविला व समजावून सांगितला असे लिहू नये.
- रात्रीच्या वेळी पंचनामा करताना बॅटरी, कंदील, रस्त्यावरील विजेच्या प्रकाशात केला आहे याची नोंद करावी.

# घरझडती / जप्ती पंचनामा

## गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय
## नाशिक

# घरझडती / जप्ती पंचनाम्यासंबधीच्या कायदेशी तरतुदी

➢ **फौ.दं.प्र.सं. कलम १०० मधील पोट कलमांतील तरतुदी :-**

- नमुद कलमान्वये घरझडती न्यायालयाने दिलेल्या वॉरंटानुसार घेण्यात येते.
- झडतीची जागा बंदीस्त असल्यास तेथे राहणा-या इसमाने झडती घेण्यास मुक्त प्रवेश देणे आवश्यक आहे.
- प्रवेश नाकारल्यास फौ.दं.प्र.सं. कलम ४७(२) प्रमाणे जबरदस्ती प्रवेश करता येतो. (प्रवेशव्दारातुन अथवा प्रवेशव्दार, खिडकी, भिंत इत्यादी फोडुन)
- झडती चालु असतांना संशयीत इसमाने त्यांचे अंगावर माल लपवुन ठेवला असेल तर त्याचीही अंगझडती घेता येते. ती व्यक्ती स्त्री असेल तर दुस-या स्त्रि कडुन तिची अंगझडती घेता येते.
- घरझडती करीता स्थानिक पंच अथवा दुसरीकडे राहणारे पंचाची निवड करून त्यांना पंच / साक्षीदार म्हणुन घरझडतीचे वेळी हजर राहणे करीता लेखी आदेश देवु शकतो.

# घरझडती / जप्ती पंचनाम्यासंबधीच्या कायदेशीर तरतुदी

## ➢ फौ.दं.प्र.सं. कलम १०० मधील पोट कलमांतील तरतुदी :-

- पंचासमक्ष झडती घेतेवेळी जेवढया अक्षेपार्ह वस्तु/माल जप्त केला जाईल त्या सर्वांची यादी तयार करून त्या यादीवर पंचाच्या सहया घेतल्या पाहिजे.
- घरझडतीचे पंचनाम्याकरीता उपस्थीत पंचाना न्यायालयाने खास समन्स पाठविल्याशिवाय न्यायालयात झडतीचा पंच म्हणुन उपस्थीत राहणे आवश्यक नाही. याची माहीती पंचाना दिली पाहीजे.
- झडती घेतलेल्या जागेच्या ताबाधारकाला किंवा त्याचे वतीने दुस-या व्यक्तीला झडती प्रक्रीयेच्या वेळी हजर राहता येईल. तसेच झडतीत जप्त केलेल्या वस्तुची यादी त्याला देवुन त्याची दुय्यम प्रतिवर स्वाक्षरी घेतली पाहीजे.
- घरझडती पंचनाम्याकरीता पंचाना उपस्थीत राहणे बाबतचा आदेश देवुनही वाजवी कारणाशिवाय त्यांची पंच म्हणुन उपस्थीत राहण्यास नकार दिल्यास अशा इसमांविरूध्द भा.द.वि. कलम १८७ प्रमाणे कार्यवाही करता येते.

# घरझडती / जप्ती पंचनाम्यासंबधीच्या कायदेशीर तरतुदी

## ➤ फौ.दं.प्र.सं. कलम १६५ मधील तरतुदी :-

- या कलमान्वये पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हयाचे तपासादरम्यान संशयतीचा शोध अथवा गुन्हयाशी संबधीत वस्तु / माल जप्त करण्यासाठी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कोणत्याही जागेची वॉरंटाशिवाय झडती घेण्याचा अधिकार तपासी अंमलदाराला आहे.
- तपासी अधिकारी / अंमलदार अशी घरझडती स्वता अथवा काही कारणास्तव दुस-या अंमलदाराला आदेश देवुन करवुन घेवु शकतो.
- नमुद कलामान्वये केलेली घरझडती पंचनाम्याची दुय्यम प्रत जागेच्या ताबेदाराने विनंती केल्यास त्याला विनामुल्य देण्यात यावी.तसेच नमुद कलमातील पोट कलम १ ( घरझडतीची कारणे ) व ३ ( दुस-या कडुन घरझडती करवुन घेतली असल्यास) अंतर्गत केलेल्या नोंदीच्या प्रती तपासी अधिका-याने / अंमलदाराने जवळच्या दंडाधिका-याकडे पाठवाव्यात
- कलम १०० मध्ये नमुद केलेल्या कार्यपध्दती प्रमाणे झडती घेण्यात यावी.

# घरझडती / जप्ती पंचनाम्यासंबधीच्या कायदेशीर तरतुदी

- **फौ.दं.प्र.सं. कलम १६६ मधील तरतुदी :-**

- या कलमान्वये पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हयाचे तपासादरम्यान संशयतीचा शोध अथवा गुन्हयाशी संबधीत वस्तु / माल जप्त करण्यासाठी दुस-या पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कोणत्याही जागेची वॉरंटाशिवाय झडती घेणेसाठी संबधीत पोलीस ठाण्यातील अंमलदाराला आदेश करता येईल
- तपासी अधिकारी / अंमलदार यांना दुस-या पोलीस ठाण्यातील अधिकारी / अंमलदार यांचे मार्फतीने झडती घेणे या प्रक्रीयेला उशीर लागु शकतो. त्या दरम्यान गुन्हयाशी संबधीत वस्तु / अथवा पुरावे नष्ट होउ शकतात असे वाटत असल्यास स्वता संबधीत पोलीस ठाण्याच्या हद्दीत जावुन अशा ठिकाणाची कलम १०० व १६५ मध्ये नमुद असलेल्या तरतुदी प्रमाणे घरझडती घेवु शकतो.

# घरझडती / जप्ती पंचनाम्यासंबधीच्या कायदेशीर तरतुदी

## ➢ फौ.दं.प्र.सं. कलम १६६ मधील तरतुदी :-

- कलम १६५ मधील पोट कलम १ ( घरझडतीची कारणे ) व ३ ( दुस-या कडुन घरझडती करवुन घेतली असल्यास) अंतर्गत केलेल्या नोंदीच्या प्रती तपासी अधिका-याने / अंमलदाराने जवळच्या दंडाधिका-याकडे पाठवाव्यात. तसेच न्यायालयात पाठविलेल्या नोंदीची प्रत जागेच्या ताबाधारकाने विनंती करून मागीतल्यास त्याला ति विनामुल्य देण्यात यावी.

# घरझडती / जप्ती पंचनामा करण्याची कार्यपध्दत व दक्षता

- झडती घेणे करीता स्थानिक किंवा दुस-या ठिकाणी राहणारे अब्रुदार पंचाची निवड करावी.
- त्यांना पंच म्हणुन उपस्थीत राहणे करीता लेखी आदेश द्यावा.
- गुन्हेगारी अथवा व्यावसायीक पंचाची निवड करू नये.
- झडती घेणेपुर्वी जागा ताबेदाराला त्याचे नांव विचारून झडतीचा उद्देश समजावुन सांगावा,
- तपासी अधिकारी /अंमलदार अथवा झडती करीता नियुक्त केलेल्या अधिकारी /अंमलदार यांनी जागा ताबेदाराला स्वताची तसेच पंचाची अंगझडती करणेस सांगावे.

# घरझडती / जप्ती पंचनामा करण्याची कार्यपध्दत व दक्षता

- बंदीस्त जागेत प्रवेश करणे पुर्वी घरातील महीला यांना बाहेर जाणेस सांगावे.
- झडती घेतांना कोणत्याही धार्माच्या / जातीच्या भावना दुखावणार नाही याची दक्षता घ्यावी.
- महीलांच्या मानसन्मानाबाबत  कोणतीही अक्षेपार्ह घटना घडणार नाही याची दक्षता घ्यावी.
- पंचनाम्याला जातांना सोबत महीला अधिकारी / कर्मचारी यांना अथवा महीला पंच यांना सोबत घ्यावे.
- पंचनाम्यात जप्त करण्यात आलेल्या वस्तुंचे वर्णन लिहीतांना मोकडी जागा सोडु नये.
- जप्त करण्यात आलेल्या वस्तुंवर लावलेल्या लेबलवर आतमधील वस्तुंचे वर्णन लिहीण्यास विसरू नये.

# घरझडती / जप्ती पंचनामा करण्याची कार्यपध्दत व दक्षता

- वस्तु ताब्यात घेतांना एका पेक्षा अधिक वस्तु एकत्र बांधुन ताब्यात घेवु नये.
- जप्त करण्यात आलेल्या वस्तु कोणत्या ठिकाणावरून ताब्यात घेतल्या त्याचे सविस्तर वर्णन पंचनाम्यात लिहावे.
- जप्ती पंचनाम्या दरम्यान घेतलेल्या वस्तुंना त्या जागेवरची माती लागली असल्यास त्या जागेवरील मातीचा नमुना परीक्षणासाठी घ्यावा.
- पंचनाम्याची प्रत मिळाल्याबाबत आरोपी किंवा ज्या इसमांकडुन वस्तु जप्त करण्यात आलेल्रुा आहेत त्याची जप्ती पंचनाम्यावर सही घ्यावी.
- पंचाना अवगत असलेल्या भाषेमध्येच पंचनामा लिहावा.
- पंचाना मराठी येत नसुन देखील पंचनाम्यात शेवटी पंचनामा मराठीतुन वाचुन दाखविला व समजावुन सांगीतला असे लिहु नये.

# जप्ती पंचनाम्याचे नमुने

## चोरीस गेलेले वाहन मिळून आले त्या वाहनाचा पंचनामा.

पंच क्र. १. श्री ........................................................................................................ हिन्दु ........... वर्षे

व्यवसाय : .............................................. पत्ता : ..............................................................

पंच क्र. २. श्रीमती ................................................................................................ मुस्लिम ......... वर्षे

व्यवसाय :.............................................. पत्ता : ..............................................................

आज दिनांक ........... रोजी .............. वालता आम्हां वरील पंचांस .............. पोलीस ठाण्याचे पो.ह.क्र १ ...... . . यांनी ........... पोलीस ठाण्याचे .............. रूम मध्ये बोलवून या ठिकाणी पंच म्हणून उपस्थित राहण्याची विनंती केली. त्याप्रमाणे आंम्ही पंच म्हणून उपस्थित राहिलो.

सदर ठिकाणी पो.उ.नि ....................... यांनी आम्हा वरील मंचास गुन्हा क्र. .........कलम ...... भा.दं.वि .सं. या गुन्ह्याची थोडक्यात हकिगत विषद केली व यातील चोरीस गेलेली मोटार कार ही मिळून आाली आहे. व त्या कारच्या दिसत्या परिस्थितीचा पंचनामा करावयाचा आहे असे कळविले व आम्हा पंचा समक्ष दिसत्या परिस्थितीचा पंचनामा केला तो खालील प्रमाणे सदर ठिकाणी पो.उ.नि ....................... व पो.शि.क्र. .............. . याच्या सोबत एक व्यक्ती हजर आहे त्या व्यक्तीची ओळख सदर गुन्ह्यातील फिर्यादी .......................... अशी आम्हा पंचास कलमरून देण्यात आली.

श्री. फिर्यादी ..........................यांनी सदर ठिकाणी उभी असलेली त्यांची कार अंगुलीनिर्देश करून दाखवली तिचे वर्णन पुढील प्रमाणेआहे.

खारचा रजिस्ट्रेशन क्रमांक .............. असून तिचा रंग................. असा आहे व ती .............. चा मेक आहे. या कारची पाहणी केली असता त्या कारचा डॅश बोर्ड हा रिकामा दिसला. फिर्यादी श्री. ..................... यांनी कळविले कि. सदर ठिकाणी .............. व्यापार चिन्हाचा एक टेपरेकॉर्डर होता तो नाहिसा झाला आहे. नंतर आम्ही कारच्या टायरची पाहणी केली असता त्या ठिकाणी ४ जुने टायर बसविण्यात आल्याचे आम्हीं पाहिले. फिर्यादी श्री. ..................... यांनी कळविले कि. सदर ठिकाणी ४ नवे टायर होते व ते बदलून जुने टायर बसविण्यात आले आहेत. नंतर आम्ही पंचानी डिकी उघडून पाहणी केली असता डिकी रिकामी आढळली. फिर्यादी श्री. ..................... यांनी आम्हां पंचास कळविले कि. सदर डिकीमध्ये एक नविन टायर व लोखंडी पाने, जॅक इत्यादी वस्तू होत्या त्या नाहिश्या झाल्याचे आहेत. सदर कारला बसविण्यात आलेले टायर हे ........... व्यापारचिन्हाचे असून ते झिजल्यामुळे गुळगुळीत झाल्याचे आढळले.

पंचनाम्यात पोलीसांना मिळून आलेली कार क्रमांक .............. ही ताब्यात घेतली

पंचनामा दिनांक ........... रोजी सुरू केला व ......... वा. संपविला.

पंचनामा ................. या ठिकाणी तयार करण्यात आला.

पंचनामा आंम्हा पंचांस मराठी मध्ये वाचून दाखविण्यात आला आणि हिन्दीमध्ये समजावून सांगितला तो सत्य आहे.

समक्ष

पंच क्र.१. स्वाक्षरी.

पंच क्र.२. स्वाक्षरी.

........................

पोलीस उप निरीक्षक.

......... पोलीस ठाणे. मुंबई .

**टीप : वाहनाची ओळख पटविण्यास काही अडचण येत असेल तर वाहनाचा इंजिन नंबर व चासिस नंबर हे वाहनाच्या कागदपत्रात इंजिन नंबर व चासिस नंबर यांच्याबरोबर पडताळून पहावेत. इंजिन नंबर व चासिस नंबर यावरुन वाहनाची ओळख पटली असल्यास त्याबाबतची नोंद पंचनाम्यात केल्यास अगदी उत्तम.**

# ओळख परेड

## गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय नाशिक

**ओळख परेड** :-

सामान्यत: ज्या गुन्हयात फिर्यादी किंवा साक्षीदार यांनी आरोपीना पाहिलेले असते. परंतु ते आरोपीस नावाने ओळखत नाही अशा आरोपींच्या बाबतीत ओळख परेड घेणे आवश्यक असते. भारतीय साक्षी पुरावा अधिनियम 1872 कलम 9 प्रमाणे आरोपी अगर वस्तू ओळखण्यासाठी ओळख परेडचा वापर होतो. ओळखण्याचा पुरावा या कलामन्वये ग्राहय आहे व याच कलमामुळे ओळख परेड घेण्यात येते.

**ओळख परेड करताना तपासी अधिका-यांनी लक्षात ठेवण्यायोग्य महत्वाचे मुद्दे** :-

➢ आरोपीस रिमांडकामी किंवा तपासकामी बाहेर नेताना त्याचा चेहरा कपडयांनी झाकावा.

➢ आरोपीची ओळखपरेड त्याच्या अटकेनंतर 24 तासांच्या आत घ्यावी.

➢ ओळखपरेडच्या वेळी आरोपीस हातकडया, कैदयांचा पोशाख ज्यामध्ये तो ओळखला जाईल असे करु नये.

➢ आरोपीची ओळखपरेड घेतांना साम्य असणारे डमी ओळखपरेडमध्ये समाविष्ट करावेत.

➢ वारंवार ओळखपरेड घेणारे विशेष कार्यकारी दंडाधिकारी निवडू नयेत.

- एकाचवेळी 2 पेक्षा अधिक आरोपी एका ओळखपरेडमध्ये उभे करु नयेत.
- ओळखपरेड नंतर लगेचच ओळखपरेड पंचनामा संबंधीत विशेष कार्यकारी दंडाधिका-याकडून ताब्यात घ्यावा.
- पुरवणी जबाबात साक्षीदाराने ओळखलेल्या आरोपीने गुन्हयाच्यावेळी काय कृती केली होती याचा उल्लेख करावा.
- फिर्यादी किंवा साक्षीदार यांनी तक्रारीदरम्यान अथवा सुरुवातीच्या जबाबाच्यावेळी आरोपींची वर्णने दिली असतील तर अशा वर्णनांचा ओळखपरेड नंतरच्या जबाबात संबंधित आरोपीबाबत उल्लेख करावा.
- ओळखपरेड संबंधीतीची नोंद पोलीस ठाणे दैनंदिनीमध्ये घ्यावी.

# प्रश्न व सुचना



# धन्यवाद ....